




साप्ताहिक

www.dongarcharaja.com

वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

# डोंगरचा राजा

संपादक : अनिल वाघमारे








■ वर्ष ११ ■ अंक २३ ■ बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.


# राजकीय पक्षात उपरे झाले मालक...!

## मुळ पक्षातील कार्यकर्ते विस्थापित : नुसती रडारड

डोंगरचा राजा विशेष वृत्त

बीड : महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात काय सुरू आहे.? कुणालाच कळायला मार्ग नाही.? कोणाची युती कोणासोबत आहे.? आणि कोणाची आघाडी कोणासोबत झाली.? याचाच शोध घेण्यात अनेक जण गुंतले आहेत. खरंच राजकारण गलिच्छ झालंय का.? असा प्रश्न निश्चित पडला आहे. पक्षात एकनिष्ठ असणाऱ्यांना संधी दिली गेली नसल्याने राज्यभरात एक वेगळा संदेश गेला आहे. पक्ष वाढीसाठी तन-मन धनाने या कार्यकर्त्यांनी काम केले. ते कार्यकर्ते आज निवडणुकीसाठी इच्छुक असताना तिकीट न देता बाजूला फेकले गेले. हा अन्याय नाही का.? आपण कोणासाठी काम करतो का करतो हे काय चाललंय हे असे एक ना अनेक प्रश्न जे इच्छुक होते त्यांना निश्चित पडले आहेत. मुळ पक्षातील कार्यकर्ते विस्थापित यांच्या मध्ये नुसती रडारड सुरु आहे.

अन्? जे नवीन राजकीय पक्षात उपरे म्हणुन आले तेच मालक झाले.


"शुद्ध आचार, शुद्ध विचार, निष्कलंक जीवन व कितीही निंदा झाली तरी अपमान पचविण्याची शक्ती असलेल्या नेतृत्वाशिवाय खऱ्या अर्थाने विकास होणार नाही," असे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे नेहमी सांगतात.यातील केवळ शेवटचा गुण म्हणजे "अपमान पचविण्याची शक्ती" हाच अनेक राजकारण्यांनी घेतला आहे. त्या शिवाय सध्या सुरू असलेले राजकारण शक्यच नाही..

महाराष्ट्र एक छोटं गावं झालंय. एरवी गावकीच्या राजकारणात छोट्या गावात ज्या गावगुंड्या, खेळ्या चालतात त्या राज्यस्तरावर सुरू आहेत. त्याही मोठ्या नेत्यांकडून... आणखी केंद्रातील याहून मोठी मंडळी यायची आहे. 'लोकल बॉडी'चे 'ग्लोबल बॉडी' झाले आहे.

निवडणुकीत उमेदवारी मिळावी म्हणून शक्तिप्रदर्शन तर कधी नेत्याची मनधरणी करावी लागते. उमेदवारी यादी जाहीर होऊपर्यंत इच्छूक मंडळी नेत्यांचे, पार्टी कार्यालयाचे उंबरे झिवतात. पाया पडून विनंती करतात. मात्र, उमेदवारी मिळाल्यावर अत्यानंदात नेत्यापुढे एक उमेदवार नतमस्तक झाल्याचे पुण्यात पहायला मिळाले. उमेदवारी मिळाल्यावर पुणे महानगरपालिका निवडणूक प्रमुख गणेश बिडकर यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या पायावर डोके टेकविले. त्यांनी पायतील चप्पल काढत गुडघ्यावर बसून मंत्री पाटील यांच्या पायावर डोके टेकविले. सुरवातीला चंद्रकांत पाटीलही गड़बडले, मात्र सावरत त्य़ांनी बिडकर यांना विजयी होण्याचा आशीर्वाद दिला.

या सगळ्या खिचडीतून योग्य निवड करण्याची जबाबदारी आता राज्यातील सर्व शहरातील सुज्ञ मतदारांची!

जागा कमी, इच्छुक जास्त...नोकरी आणि निवडणुकीचे सारखेच...



उमेदवारी अर्जांच्या शेवटच्या दिवशी राज्यभर अभूतपूर्व नाराजीनाट्य पाहायला मिळालं. तिकीट वाटपात आयाराम आणि नातेवाईकांना संधी मिळाल्याचा आरोप होत असताना, अनेक निष्ठावंत कार्यकर्ते निराश होऊन अश्रूंनी घरी परतले.

थोडक्यात नोकरी हुकलेल्या तरुणांना जे वाटत असेल तेच आज ऐनवेळी उमेदवारी न मिळालेल्या इच्छुकांना वाटत असेल का?

तूर्त तरी राज्यात अनेकांनी चिन्ह बदलली आहेत असे म्हणून. खरच पक्षांतर झालंय का? विचारधारा, पद्धत वगैरे बदलली का ते नंतर कळेल. रात्रीतून बदल फक्त चिन्हात होऊ शकतो.

कार्यकर्त्यांनो, वार्डातील निवडणुकीसाठी खरंच तुम्हाला युती आघाडीची गरज असते का हो? मोठ्या निवडणुकीत नेत्यांना मते कोण मिळवून देतं? त्या निवडणुका जर नेते तुमच्या जीवावर लढवितात तर मग तुमच्याच वार्डात तुमच्या निवडणुकीत अडचण काय? कार्यकर्त्यांची निवडणूक असे म्हणत नेत्यांमध्येच एवढी चर्चा रंगलीय, त्यात तुम्ही कुठे आहात? शेवटी ते सांगतील तसेच होणार ना?

मुंबईत एकच नव्हे, तर तीन तीन मलिक रिंगणात... माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्यावरून भाजप आणि राष्ट्रवादीतील संबंध ताणले गेले आहेत. भाजपचा मलिक यांना विरोध आहे. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून मलिक यांनाच पुढे केले जात आहे. पक्षाची मुंबईतील मोठी जबाबदारी मलिक यांच्यावरच सोपविण्यात आली आहे.

आता त्याही पुढे जाऊन मलिक यांच्या कुटुंबातील तिघांना पक्षाकडून उमेदवारी दिली आहे. त्यामध्ये नवाब मलिक यांचे भाऊ कप्तान मलिक हे प्रभाग क्रमांक १६५, नवाब मलिक यांची बहीण डॉ. सईदा खान या प्रभाग क्रमांक १६८ तर कप्तान मलिक यांची सून बुशरा नदीम मलिक या प्रभाग क्रमांक १७० मधून निवडणूक लढणार आहेत. कप्तान मलिक यांचा मूळ वॉर्ड महिलांसाठी राखीव झाल्याने तेथे सूनबाईंना उमेदवारी देत ते स्वतः दुसऱ्या वॉर्डातून उमेदवारी करणार आहेत. अशीही घराणेशाही या पक्षात पहायला मिळत आहे.

खरं तर हे सगळे राजकारणी एकमेकांना फसवत नाहीत, तर जनतेला मूर्ख बनवत आहेत.

पण जनता त्यांनी एकमेकांना कसं फसवलं, हे बघत आणि चर्चा करीत बसली आहे. त्यांचे एकमेकांना फसवून झाले की ३ जानेवारीपासून आपला नंबर... पुढील पाच वर्षे.!




## संपादकीय

# अस्वस्थ बांगला देश

बांगला देशमध्ये फेब्रुवारी २०२६ मध्ये मध्यवर्ती निवडणुका होणार असल्या, तरी देखील ऑगस्ट २०२४ पासून हा देश जळतच आहे. पंतप्रधान शेख हसीना वाजेद त्यांच्या विरोधात उठाव झाल्यानंतर त्यांना भारताच्या आश्रयास यावे लागले. या उठावात अवामी लीग या हसीना यांच्या तत्कालीन सत्ताधारी पक्षाच्या अनेक नेत्यांची घरे जाळण्यात आली. आगामी निवडणुका लढवण्यास अवामी लीगला बंदी घालण्यात आली आहे. उलट बांगला देश नॅशनॅलिस्ट पार्टीचे (बीएनपी) विद्यमान अध्यक्ष तारीक रहमान हे सतरा वर्षांनंतर गेल्या आठवड्यात पुन्हा मायदेशी परतले. त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. सतरा वर्षे हद्दपार असलेले रहमान हे बांगला देशच्या माजी पंतप्रधान खालिदा जिया यांचे चिरंजीव. ते आगामी पंतप्रधानपदाचे दावेदार मानले जातात. जमात–ए–इस्लामी पक्षाची बीएनपीबरोबर २००१ ते २००६ या काळात युती होती. मात्र येत्या निवडणुकीत दोन्ही पक्ष एकमेकांसमोर कट्टर विरोधक म्हणून उभे राहिले आहेत.

तारीक रहमान लष्कराच्या आशीर्वादाने परतले आहेत. बांगला देशच्या राजकारणात त्यांना क्राऊन प्रिन्स असे संबोधले जाते. लष्करप्रमुख आणि माजी राष्ट्राध्यक्ष जियाउर रहमान यांचे ते सर्वात धाकटे पुत्र. खालिदा या तीनदा पंतप्रधान झालेल्या होत्या. वास्तविक पूर्वी तारीक हे बीएनपीमध्ये एक प्रमुख चेहरा म्हणून उदयास आले होते. खालिदा जियांचे राजकीय उत्तराधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. ते पक्षाचे रणनीतिकार होते आणि युवकांमध्येही लोकप्रिय होते. परंतु २००७ मध्ये देशातील राजकारण पुन्हा एकदा अनिश्चिततेच्या भोवर्यात सापडले. भ्रष्टाचाराच्या प्रकरणात त्यांना अटक करण्यात आली आणि ते दीड वर्ष तुरुंगात होते. ब्रिटनमध्ये १७ वर्षे निर्वासिताचे आयुष्य जगल्यानंतर २५ डिसेंबर रोजी ते परतले, त्यांच्याबरोबर त्यांची पत्नी झुबेदा आणि मुलगी झैमा याही परतल्या आहेत. कडक सुरक्षेमध्ये ज्या पद्धतीने तारीक यांचे स्वागत करण्यात आले, त्यावरून लष्कराचे त्यास मूक समर्थन असल्याचे स्पष्ट होते.

खालिदा सध्या आजारी असून, त्यांच्याजवळ राहण्याची इच्छा तारीक यांनी व्यक्त केली होती. परंतु वास्तविक खालिदा या कित्येक महिने आजारी असून, त्यावेळी काही तारीक यांना मायदेशात येऊ देण्यात आलेले नव्हते! बांगला देशच्या हंगामी सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस हे असून, सव्वा वर्षापूर्वी बांगला देश पेटला होता, तेव्हा युनूस यांनाही विदेशातून माघारी बोलावण्यात आले होते. सध्या युनूस यांच्याकडेच देशाच्या कारभाराची सूत्रे असली, तरी ते लष्कराचेच प्यादे आहेत. काही दिवसांपूर्वीच युवा नेते शरीफ उस्मान हादी यांची हत्या करण्यात आली आणि त्यानंतर आंदोलकांनी तेथील आघाडीचे दैनिक असलेल्या द डेली स्टारच्या कार्यालयावर हल्ले केले. अवामी लीग हा बांगला देशमधील सर्वात मोठा पक्ष असून, येत्या निवडणुकी तोच भाग घेऊ शकणार नसल्यामुळे, या निवडणुकांना काहीएक अर्थ नाही.

बीएनपी आणि जमात–ए–इस्लामी हे दोन्हीही धर्मांध आणि हिंसाचाराचे समर्थन करणारे पक्ष आहेत. भारताचा द्वेष करणे आणि भारतविरोधी कारस्थाने रचणे, हेच त्यांचे धोरण राहिलेले आहे. बांगला देशात गेल्या काही दिवसांत सात हिंदू कुटुंबांची घरे जाळण्यात आली आहेत. मागच्या आठवड्यात देशभरात प्रचंड निदर्शने झाली आणि त्यादरम्यान जमावाने २८ वर्षीय हिंदू कामगार दीपू चंद्र दास याची हत्या केली. धर्माचा अपमान केल्याच्या आरोपावरून जमावाने दीपूला मारहाण करून ठार केले आणि त्याचा मृतदेह एका झाडाला बांधून पेटवून देण्यात आला. पाकिस्तानातही धर्मनिंदेच्या आरोपावरून अशाच प्रकारे हिंदू व ख्रिश्चनांच्या हत्या झालेल्या आहेत. बांगला देशातील अल्पसंख्याकावरील अत्याचार हा भारतासाठी अधिक चिंतेचा विषय आहे. धर्मनिंदेचे आरोप करत अल्पसंख्य समाजामध्ये दहशत निर्माण करणे, हाच त्यामागचा हेतू आहे. ज्या हादीची हत्या झाली, तो भारतविरोधी कृत्य करत होता. परंतु अवामी लीग पक्षाने त्याची हत्या केली. गोळ्या झाडल्यानंतर हल्लेखोर सीमा ओलांडून भारतात लपले, असा निराधार आरोप करण्यात आला.

हादी हा राज्यशास्त्राचा अभ्यासक होता आणि खासगी विद्यापीठांमध्ये तो शिकवत होता. बांगला देशातील राजकीय परिस्थितीवर त्याने पुस्तकही लिहिले आहे. परंतु एका विशिष्ट अजेंड्यावरच तो काम करत होता. हसीना सरकारविरोधातील निदर्शनांदरम्यान त्याचे राजकीय महत्त्व वाढले. इन्कलाब मंच नावाचे एक नवीन संघटन हादीने उभे केले. हा मंच कट्टरपंथी जमात–ए–इस्लामीच्या जवळचा मानला जातो. आगामी निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्याची घोषणाही हादीने केली होती. हादीच्या खुनानंतर हजारो जिहादी बांगला देशमध्ये दंगल करून देशाची राखरांगोळी करत आहेत, अशा आशयाची टिप्पणी प्रसिद्ध लेखिका तस्लिमा नसरीन यांनी केली आहे. या देशासमोरील खरा धोका हा आहे. सध्याच्या राजकीय अस्थिरतेमुळे तो आणखी वाढला आहे.

तेथील कट्टरतावादी पक्ष आणि शक्तींना पाकिस्तानचा पाठिंबा दडून राहिलेला नाही. त्याचमुळे उफाळलेला संघर्ष देशाला कुठे नेणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. भारताकडे बोट दाखवून हे कट्टरपंथी पक्ष आपली राजकीय पोळी भाजण्याच्या तयारीत आहेत. जेन–झीच्या आंदोलनाच्या उद्रेकानंतर झालेल्या सत्तापालटानंतरही हा देश सुधारण्याचे नाव घेईना. हादीवर गोळ्या झाडणारा फैझल करीम मसूद हा अवामी लीगच्या छात्र लीगशी संबंधित आहे. हसीनाविरोधी बंडानंतर दहशतवादविरोधी कायद्याच्या अंतर्गत छात्र लीगवर बंदी घालण्यात आली होती. गेल्या वर्षी बांगला देशमधील बंडानंतर तेथे नॅशनल सिटिझन्स पार्टी नावाच्या दुसर्या एका पक्षाची स्थापना करण्यात आली. त्याचे नेते नाहिद इस्लाम हे युनूस यांच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकारमध्ये होते. हादी हा बांगला देशसाठी लढताना शहीद झाला. भारताने हादीचे मारेकरी आणि शेख हसीना यांना आमच्याकडे परत सोपवावे, अशी पोस्ट नाहिद यांनी लिहिली आहे.

# बुद्धगया दर्शन धम्म सहल प्रवास वर्णन

## माजी केंद्रीय मुख्याध्यापक श्रीराम वाघमारे गुरुजी यांच्याच शब्दात

डोंगेश्वरी – , या ठिकाणी गौतमांनी त्याच श्रमनासोबत सहा वर्ष तपस्या केली. पण त्यांच्या मनाचे समाधान झाले नाही त्या सहा वर्षात ते रोज खाली गावात जाऊन पाच घरी भिक्षा घेत पण पाच घासच भिक्षा घेत. कधी दोन घरी दोन घास भिक्षा घेत व ग्रहण करीत असतात असे करता करता त्यांचे शरीर एकदम शांत झाले पोट पाटीला चिटकले. त्यांना उठता देखील येत नसे झाले. एक दिवशी उरविला येथे भिक्षा मागण्यासाठी गेले. तेव्हा जास्त थकले. ते विश्रांती करीता एका वडाच्या झाडाखाली त्याच्या बुडाला बसले. त्या उरविला गावात एक सैनानी नावाचा व्यक्ती राहत होता. त्याला एक मुलगी होती. तिचं नाव सुजाता होते. तिला एक दासी होती. सुजाताने त्या वडाच्या झाडाला पूजा मागून नवस केला होता. की मला मुलगा झाला तर मी १००० गाईच्या दुधाची खीर दान करीन तिची दासी रोज त्या झाडाखालचे स्वच्छ करण्यासाठी येत होती. गौतम ज्या दिवशी सकाळी त्या झाडाखाली बसले होते. त्यावेळी ती दासी सफाई करण्यासाठी तिथे आली होती. तिने त्यांना पाहिले आणि धावत जाऊन सुजातास सांगितले की तिथे देव प्रगट झाले आहेत. तिला फार आनंद झाला. आणि तिने नवस केल्याप्रमाणे दूध जमा करून ते पूर्ण गोठवून त्याची खीर बनवली. स्नान करून ती खीर सोन्याच्या ताटात घेऊन त्या वडाच्या झाडाखाली गौतम बसले होते. तिथे आली. त्याचवेळी गौतम ध्यानस्थ बसले असता. त्यांना साक्षात्कार झाला की तीन स्त्रिया गळ्यात विना घालून आल्या आहेत. त्या विन्याच्या तारा छेडत आहेत. पण त्यांच्या त्या विण्याच्या तारा योग्य प्रमाणात फिट केलेल्या नव्हत्या. त्यातील एकीच्या विण्याच्या तारा खूपच कसल्या होत्या. म्हणून त्याचा आवाज करखस येत होता. तर एकीने तारा फारच ढील्या केल्या होत्या. म्हणून त्याचा आवाज बदसूर येत होता. आणि तिसरीने आपल्या विण्याच्या तारा जेमतेम व मध्यम



प्रमाणात कसल्या होत्या. म्हणून त्याचा आवाज सुरेख येत होता. तेव्हा गौतमांनी असे जाणले की आपले शरीर एक विनाच आहे. तरी आपण त्या शरीर रुपी विन्याला जास्त ताण देणे बरोबर नाही. आणि जास्त ढिले सोडणे बरोबर नाही. त्याला मध्यम अवस्थेत ठेवण्यास पाहिजे. त्याकरिता त्याला अन्नाची गरज आहे. हे गौतमाला वाटले. तोच त्यांचे डोळे उघडले. आणि सुजाता खिरीचे ताट हातात घेऊन उभी आहे. हे त्यांनी पाहिले लगेच ते खिरीचे ताट गौतमाने स्वीकारले. त्यावेळी ते पाच श्रम तिथेच होते ते पाच श्रमक गौतमाला सोडून निघून गेले. कारण त्यांनी असे समजले की गौतमांनी आपली तपस्या भंग केली. नंतर गौतमांनी ती खीर ग्रहण केली.लगेच त्यांना आव आला ते ताट सुजाता वापस करीत असता ते सुजाताने



घेतले नाही. ते दान दिले हे वापस घेतले जात नाहीत. असे ती म्हणाली गौतमाने ते ताट हातात घेऊन पाणी पिण्यासाठी निरंजना नदी काठी गेले ते पाणी पिऊन शांत झाल्यावर विचार करू लागले. त्यांनी असा विचार केला की जर मला ज्ञान प्राप्त होणार असेल तर हे ताट नदीपात्रात सोडले असता प्रवाहाच्या उलट्या दिशेने वाहत जाईल. असे मनात आणून ते ताटपात्रात फेकले आणि ते ताट उलट्या दिशेने वाहत जाऊन एका डोहात बुडाले. नंतर ते तिथून निघून १८ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या गया या ठिकाणी आले तिथे एक पिंपळाच्या झाडाखाली बसू लागले.पण बसण्यासाठी तिथे काहीच नव्हते तेथून गवळी गवताचा भारा घेऊन जात होता. त्याने गौतमाला पाहिले त्याने भाराखाली टेकून त्यातील पाच मुटी गवत गौतमा समोर ठेवले आणि ते निघून गेला. गौतमाने ते गवत त्या पिंपळाच्या झाडाच्या बुडापाशी आंतरुण त्यावर पूर्वेकडे तोंड करून ते तिथेच बसले आणि मनात असे ठरवले की पाऊस येऊ, ऊन पडो, जोराची हवा असो आणि कडाक्याची थंडी जरी पडली तरी न डगमगता बसून राहायचे असे मनाचे ध्येय केले.

राजगीर – राजगीर या ठिकाणी आमची गाडी अकरा वाजता गेली तिथे खाली गाडी उभा करून तिथे स्वयंपाक वाले स्वयंपाक करत बसले आणि आम्ही सर्व राजगीर येथील स्तूप पाहण्यास निघालो होतो. ते स्तुप उंच अशा डोंगरमाथ्याशी आहे. तिथे पर्यंत पाय–या देखील बनवल्या आहेत पण ते पायी चालत तीन किलोमीटर जावे लागते. तिथे सरकारने प्रवासासाठी जाण्याची व्यवस्था केली आहे. तिथे वर जाण्यासाठी पाळण्याची सोय केली आहे ते विजेवर चालतात.त्याकरिता तीस रुपये तिकीट काढावे लागते.पाळण्यात बसून वर गेल्यानंतर तिथे सुंदर पैकी एक विहार आहे. तिथे गौतम बुद्ध प्रथम आले तेव्हा त्या डोंगराच्या पूर्वेकडील बगलाला बसले होते ते देखील आम्ही पाहिले तेथील डोंगरभाग फारच सुंदर आहेत. तिथे पूर्वी बिंबिसार राजाची राजधानी होती. ते पाहून झाल्यानंतर आम्ही सर्व गरम पाण्याचे झरे पाहण्यासाठी गेलोत ते झरे डोंगराच्या निम्म्या भागातून येतात तिथे तुट्या बसविल्यासारखे डोंगर कोरून तयार केले गेले आहेत. त्या वाटे पाणी आपोआप सारखे वाहते. त्या पाण्यातून सारख्या गरम वाफा निघतात. त्या तुट्याखाली बसून प्रवासी स्नान करतात. त्याखाली मोठे हौद बनवले आहेत.त्यात ते गरम पाणी जाते त्या हौदात माणसे डुबक्या मारतात. फारच मज्जा वाटते.त्याचा त्याच पाण्यात पाठ सोडला आहे. नंतर खाली हौद बनवले आहेत. त्यात तेथील लोक कपडे धुतात...

क्रमशः

## निस्वार्थी व्यक्तिमत्व असणारे सर्वसामान्यांचे काका....

# मा.आ.श्री मोहनरावजी सोळंके

रुळलेल्या वाटेने जाणारे बरेच असतात, परंतु स्वतः वाट निर्माण करणारा एखादाच असतो..... नशीबवान तर सर्वच असतात परंतु नशिबाला ही बदलणारा एखादाच असतो.... माजलगाव मतदार संघात,प्रगतीच्या वाटेवर घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय देणारा.... जिल्ह्याचे खंबीर अन्? उत्तुंग नेतृत्व.... म्हणजे शिक्षणमहर्षी आदरणीय श्री मोहनरावजी सोळंके काका होय.श्री शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थापक,अध्यक्ष,माजी आमदार आदरणीय श्री मोहनराजी सोळंके काका हे माजलगाव तालुक्यातील एक आदर्श व्यक्तिमत्व.

माजलगाव विधानसभा मतदार संघाच्या राजकीय कुरुक्षेत्रात जे राजकारणी आहेत त्यात माजी आमदार मोहनरावजी सोळंके काका यांना आदराचे व मानाचे स्थान आहे. मा.मोहनरावजी सोळंके काका हे १९८५ ते १९९० या काळात माजलगाव मतदार संघाचे आमदार होते. काकांचा जन्म शार्दुलेश्वराने पावन असलेल्या 'सादोळा' या गावी झाला.या ठिकाणी त्यांचे बालपण गेले.याच गावी त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले व पुढील शिक्षण नुतन विध्यालय सेलू या ठिकाणी झाले.ज्या घरात लक्ष्मी व सरस्वतीचे वास्तव्य आहे अशा ऐश्वर्यसंपन्न घराण्यात त्यांचा जन्म झाला.जीवनात कसल्याही प्रकारच्या सुखसोयींची कमतरता नसतानाही ऐश्वर्यात न रमता आपल्या अवती-भोवती असणाऱ्या जनसामान्यांचे दु:ख,दारिद्र्य, वेदना पाहुन त्यांचे मनही हळहळू लागले.त्यांचे मन सामान्य माणसाच्या मनाचा ठाव घेऊ लागले. जन-सामान्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे असे सतत त्यांना वाटे. समाजातील जनसामान्याबद्दल काकांनी केवळ विचारच केला नाही तर आपले विचार त्यांनी कृतीत उतरविले.

माजलगाव विधानसभा मतदार संघाच्या राजकीय कुरुक्षेत्रात जे राजकारणी आहेत त्यात माजी आमदार मोहनरावजी सोळंके काकांना अतिशय आदराचे व मानाचे स्थान आहे.१९८५ ते १९९० या काळात काका माजलगाव मतदार संघाचे आमदार होते.त्यांनी आपला आमदारकीचा काळ खूप गाजवला.त्या काळात त्यांचा खूप



दरारा होता तो आजही कायम आहे. आपल्या मतदार संघात त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक जनहिताची कामे केली. त्यांनी पाणीपुरवठा योजना,रस्त्यांची कामे, नाल्यांची कामे, शाळा, समाजमंदिर, सांस्कृतिक सभागृहे,जलसिंचनासाठी अनेक छोटे-मोठे तलाव यासह इतर अनेक विकास कामे केली.त्यांनी केलेली विकास कामे ही अतिशय दर्जेदार आहेत.त्यांची कामे एवढी टिकाऊ व चांगल्या प्रतीची होती की त्यांच्या कामाची दुरुस्तीही अनेक वर्ष करण्याची गरज भासली नाही.अशी दर्जेदार कामे आज दिसून येत नसल्याने त्यांची कामे इतरांसाठीआदर्शच आहेत.

शिक्षण क्षेत्रातील काकांचे कार्य,त्यांचे योगदान अतिशय मोलाचे आहे,त्या काळात ग्रामीण भागातील शिक्षणाची दुरावस्था त्यांच्या लक्षात आली. आपल्या परिसरातील अनेक भागात शिक्षणाची सोय नसल्यामुळे या भागातील मुले-मुली शिक्षणापासून वंचित आहेत.काही ठिकाणी प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर पुढील शिक्षणाची सोय नसल्यामुळे विद्यार्थी अर्धवट शिक्षण सोडत असत. काकांनी त्या काळात शिक्षणाचे महत्त्व ओळखले म्हणून शिक्षणाबाबतची ही दूरावस्था त्यांनी लक्षात घेऊन आपल्या माजलगाव मतदार संघातील ग्रामीण भागातील तळागाळातील लोकांपर्यंत ज्ञानगंगा पोहचविण्याकरिता शैक्षणिक क्षेत्रात शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेचे छोटेसे रोपटे लावले.आज त्याचे वटवृक्षात रूपांतर झालेले आहे.

इवलेसे रोप लावीयेले द्वारी । त्याचा वेलु गेला गगनावरी ।। या उक्ती प्रमाणे त्यांनी शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात ठिकठिकाणी शाळा काढल्या, ज्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची चांगली सोय झाली. काकांनी शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आपल्या मतदार संघातील उमरी, नित्रुड, देवडी, दिंद्रुड, किट्टी आडगाव व मोटेवाडी या सर्व ग्रामीण भागात शिक्षणाचे जाळे पसरविले. या ग्रामीण भागात शाळा चालू करून शैक्षणिक प्रगती घडवून आणली यामुळे त्या ठिकाणाच्या व जवळपासच्या विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली. ग्रामीण भागातील मुले व मुलींना शिक्षण सुलभ झाले. घराघरात ज्ञानाची ज्योत तेवत ठेवून हजारो तरुणांना सुशिक्षित व सुसंस्कृत करून उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित केले.



**श्रीमती फलके एस.डी.**
**(धवलशंक)**
**९९६०३७४१७४**

काकांच्या शाळेत शिक्षण घेतलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रात मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील मुली देखील काकांनी शाळा काढल्यामुळे शिकु शकल्या त्यामुळे मुलीसुद्धा आज काकांचे आभार मानतात.

माजलगाव परिसरासाठी काकांचे शैक्षणिक योगदान फार मोठी आहे.त्यांच्या कार्यातून जनमाणसांबद्दलचे प्रेम,जिव्हाळा त्यांना असलेला दिसून येतो. त्यांच्या शैक्षणिक संस्थेत असणारे कर्मचारी यांच्या बद्दलही त्यांना आपुलकी, अभिमानाची भावना असलेली दिसून येते. प्रत्येकाला आपल्या परिवाराबद्दल जेवढी आपुलकीची भावना असते तेवढीच आपुलकीची भावना त्यांना त्यांच्या शाळेतील कर्मचाऱ्यांबद्दल दिसून येते. माझे कर्मचारी चांगले आहेत, निर्व्यसणी आहेत. माझे कर्मचारी चांगले काम करतात. त्यांच्या बोलण्यातून त्यांचा कर्मचाऱ्यांबद्दलचा अभिमान दिसून येतो.

काका म्हणजे साधेपणा, सत्यनिष्ठा, सच्चेपणा, असत्याची चिड, सडेतोड बोलणे, मानवता, सर्वधर्मसमभाव, निर्भय व लोककल्याणाची तळमळ, दानीवृत्ती, परोपकारी वृत्ती, दु:खितांच्या दु:खात सहभागी होणारे असे अष्टपैलू व्यक्तिमत्व होय. ज्यांच्या कर्तत्वाचे हात आभाळाला भिडतात,तो माणूस यशस्वी होतो. पण आभाळाला हात लागून सुद्धा ज्याचे पाय जमिनीवर असतात, तोच खरा मोठा माणूस.

वरील विचार अगदी तंतोतंत काकांना लागू पडतात. अशा या सर्वसामान्यांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या लोकप्रिय नेत्याला दीर्घायुष्य लाभावे. आरोग्य सदा चांगले राहो,ही सदिच्छा.

हे परमेश्वरा जनसामान्यांना सुखविण्या
शतायुषी त्यांना कर.....!
शतायुषी त्यांना कर.....!

आमचे सर साहेबांच्या संपर्कात आले तेव्हापासून आमचे सर कुटुंबामध्ये चर्चा करायचे या अगोदर इतरांकडून ऐकलेल्या गोष्टी प्रत्यक्ष अनुभवायला आल्या. साहेबांचा (काकांचा) दरारा, सर्वांशी माणुसकीने वागणे, जनसामान्यांबद्दलची आपुलकी याविषयी चर्चेतून माहिती मिळे. आमचे सर साहेबांविषयी सांगायचे आमचे साहेब असे आमचे साहेब तसे. आमचे साहेब फार कडक आहेत, सच्चे आहेत तेवढेच ते मनमिळावु आहेत. सर्वांच्या अडीअडचणींची चौकशी करतात. अशा अनेक साहेबांबद्दलच्या गुज गोष्टी मोठ्या अभिमानाने सर सांगतात, अन तेच विचार माझ्या विचाराच्या कक्षेतून मांडण्याचा हा छोटासा प्रयत्न. अशा महान व्यक्ती विषयी मला माझ्या मनातील मी अनुभवलेले विचार व्यक्त करण्याची संधी मला मिळाली. त्याबद्दल मी स्वतःला धन्य समजते.

# जयसिंह सोळंके यांच्या वाढदिवसा निमित्त क्रीडा साहित्य वाटप

बाहेगव्हाण येथील जिल्हा परिषद शाळेत लोकनेते, सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना, तेलगावचे व्हाईट चेअरमन तसेच माजी जिल्हा परिषद सभापती श्री. जयसिंग सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत क्रीडा साहित्य वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला.

या उपक्रमाचे आयोजन अमरसिंह मस्के व अजय जाधव यांच्या वतीने करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबतच क्रीडेला महत्त्व मिळावे, खेळातून शिस्त, आरोग्य व आत्मविश्वास वाढावा या उद्देशाने विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे क्रीडा साहित्य वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास उपस्थित नंदकिशोर मस्के माजी सरपंच,अनुरथ भैय्या मस्के ,मुंजाबा डांबे शालेय समिती अध्यक्ष, संदीप शिंदे ,डिगांबर मस्के,वैभव मस्के, विजय मस्के,सत्यजीत मस्के,भागवत मस्के, अजित जाधव, संदीप घोलप,अजय कदम,शिवदास



मस्के,आदित्य मस्के सह मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका व विध्यार्थी पालकवर्ग गावातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात चिमुकल्या बाळगोपाळांच्या स्वागतगीत व सुंदर पर गीत गायनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने संपूर्ण वातावरण आनंदी व उत्साही झाले.यावेळी अमरसिंह मस्के व अजय जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "

आदरणीय जयसिंग भैय्या सोळंके हे नेहमीच शिक्षण, क्रीडा व समाजहिताच्या उपक्रमांना प्रोत्साहन देणारे नेतृत्व आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहणे हेच

आमच्यासाठी खरे समाधान आहे. भविष्यातही अशा सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांसाठी आम्ही सदैव तत्पर राहू."

तसेच या वेळी विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी जयसिंग भैय्या सोळंके यांना वाढदिवसानिमित्त सामूहिक शुभेच्छा दिल्या. उपस्थित मान्यवरांनी शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी प्रगती करावी, असे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी, विद्यार्थी मित्र, पालकवर्ग व गावातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आनंदी वातावरणात कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

साप्ताहिक
डोंगरचा राजा
बुधवार, दि.३१ डिसेंबर २०२५ । पान ३

# माझे वडील – क्रीडाशिक्षक श्री धवलशंक सरांची सेवानिवृत्ती

जिनकी सोच में
आत्मविश्वास की मेहक हैं
जिनके इरादे बुलंद हैं,
और जिनकी नियत में सच्चाई
रग-रग में भरी हैं,
उनकी पूरी जिंदगी काटों का मेहकताहुआ गुलाब है

रामेश्वर विद्यालय, उमरी या विद्यालयातील सन्माननीय क्रीडाशिक्षक श्री धवलशंक सी.बी. यांनी सलग १८ वर्षे ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. दिनांक ०१/१०/२००७ पासून सेवेला सुरुवात केली व दिनांक ३१/१२/२०२५ रोजी ते सेवानिवृत्त होत आहेत. ते अतिशय मनमिळावू,समंजस, जिद्दी व मेहनती असे व्यक्तिमत्व असणारे माझे पप्पा.

यापुढील आयुष्य तुम्हाला स्वतःसाठी, स्वतःच्या आनंदासाठी, कुटुंबासाठी चांगल्या पद्धतीने जगता यावे याकरिता अगदी मनःपूर्वक शुभेच्छा.

आयुष्यातील प्रत्येक वळणावर, तुमच्या आयुष्यात आनंद यावा....!

या पुढचा तुमचा प्रवास हसरा आणि आनंद देणारा असावा....!

कुटुंबाची,शाळेची जबाबदारी पार पाडण्यासाठी तुम्ही कष्ट केले अपार....!

आता ही वेळ म्हणते थांबा
करा थोडा आराम....!
करा थोडा आराम....!

श्री धवलशंक सर हे हाडाचे शिक्षक होते.शिक्षणक्षेत्रातील त्यांचे योगदान हे अतिशय मोलाचे आहे.

शिक्षण क्षेत्राला अतिशय प्राचीन काळापासून ते आत्तापर्यंत लाभलेली आदर्श परंपरा,नावलौकिक जो आहे.भारतातील ज्या थोरामोठ्यांनी या क्षेत्रासाठी अगदी नि:स्वार्थ सेवावृत्ती भावनेने जे आपले मौल्यवान आयुष्य खर्च केले त्यामुळे समाजात जे काही आदर्श व्यक्ती टिकून आहेत ते या थोरांनी दिलेल्या आदर्श संस्कारामुळे शिक्षण क्षेत्रात हा नाव लौकिक मिळवत असताना जसे थोर लोक कारणीभूत होते त्याप्रमाणे या थोरांसोबत अगदी देशातील खेळा-पाड्यात थोरांच्या आदर्श विचारांना आपल्यासोबत घेऊन ज्ञानदानाचे कार्य करणारी गुरुजन मंडळीही होती.ज्यायोगे या क्षेत्राला भरारी प्राप्त होण्यास आपल्या परीने त्यांचाही हातभार लागत होता,लागत आहे.

याच गुरुजन पंक्तीतील एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणजे श्री धवलशंक सी.बी.



सर.ते क्रीडाशिक्षक असल्यामुळे सतत मैदानावर / क्रीडांगणांवर त्यांचे काम पण कधीही ऊन,वारा याची तमा न बाळगता अगदी उत्साहाने विद्यार्थ्यांचे खेळ ते घेत असत. इतरांना त्यांचे सततचे कार्य बघून कौतुक वाटे. खेळाचा तास म्हटले की विद्यार्थ्यांचा सर्वात आवडतीचा तास. विद्यार्थी आनंदीत होत. सर ही अगदी मेहनतीने व आनंदाने विद्यार्थ्यांचे विविध खेळ घेत. विद्यार्थ्यांना खेळाबद्दल मार्गदर्शन करणे, खेळाचे नियम समजावून सांगणे, खेळांसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे, पालकांना मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगणे, वेळोवेळी पालकांना मार्गदर्शन करणे – आपल्या कार्यकाळात ही सर्व कार्य यशस्वीरित्या त्यांनी पार पाडली. त्यांच्या कारकिर्दीत अनेक वेळा खेळात यशस्वी झाले. त्यांच्या काळात बऱ्याच वेळा खेळात विद्यार्थी तालुका पातळीवर, जिल्हा पातळीवरही यशस्वी झाले तसेच विभागावरही गेले. एक शिक्षक म्हणून सरांनी आपले कर्तव्य अतिशय उत्तम प्रकारे पार पाडलेले आहे.



कु. गायत्री चंद्रकांतराव धवलशंक
९९६०३७४१७४

माणसांमध्ये जिद्द,चिकाटी व मेहनत करण्याची तयारी असावी. आपल्या आवडत्या क्षेत्रात काम करा.शिक्षक व समाजाला तुमचा हेवा वाटेल.कष्ट करण्याची सवय झाल्यावर आळस येत नसतो,त्यामुळे जीवनात यशस्वी होण्यासाठी परिश्रमाची सवय ठेवल्यास अनपेक्षित यश मिळेल असे मोलाचे मार्गदर्शन सतत ते आपल्या विद्यार्थ्यांना करत असत.विद्यार्थी,पालक,शिक्षक, पदाधिकारी व सहकाऱ्याच्या सहकार्याने शिक्षण क्षेत्रातील दैवत असलेल्या विद्यार्थी वर्गाला संस्कारीत करण्याचे काम त्यांनी केले.

खरोखरच तुमचे विद्यार्थ्यांसाठी असलेले समर्पण खूप खूप कौतुकास्पद आहे.

तुमच्या कार्याला सलाम!

सरांनी कधीही विद्यार्थ्यांना धाक दाखवला नाही कधी मारलेही नाही,अगदी हसत खेळत विद्यार्थ्यांना ते शिकवत म्हणूनच ते विद्यार्थीप्रिय शिक्षक होते.

एक 'माणूस' म्हणून सर अतिशय प्रेमळ,मनमिळावू,उदार वृत्ती, समंजसपणा अशा अनेक गुणांनी परिपूर्ण सर आहेत. सरांचा स्वभाव अतिशय शांत, अभ्यासू,अजातशत्रू आहे.

त्यांना त्यांच्या जीवनात अतिशय संघर्ष करावा लागला.शिक्षणापासून ते आजपर्यंत प्रत्येक गोष्टींचा लढा त्यांनी दिला.जीवनात कसलेही वादळ आले तरी अतिशय शांतपणे वादळाचा सामना ते करतात.प्रत्येक गोष्टींकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन सकारात्मक असतो.सरांनी त्यांच्या जीवनात शून्यातून विश्वनिर्मिती केलेली आहे.या सर्व कष्टाचे पुलीत म्हणून आज ते यशस्वी जीवन जगत आहेत.

एवढ्या सर्व व्यापक जीवनातून त्यांनी आपल्या मुलांनाही चांगले शिक्षण दिले आहे.त्यांच्यावर त्यांनी चांगले संस्कार केले आहेत.त्यांची मुलगी कु.गायत्री चंद्रकांत धवलशंक उच्च पदवी प्राप्त आहे व मुलगा गजानन चंद्रकांत धवलशंक हा लातूर या ठिकाणी शिक्षण घेत आहे.

अरण्यामध्ये सिंहाचा कोणी राज्याभिषेक करत नाही वा अन्य कोणताही औपचारिक विधी करत नाही तर सिंह आपल्या स्वतःच्या पराक्रमामुळे स्वतःच अनभिषिक्त असा राजा झालेला असतो. माझ्या वडिलांच्या जीवनाला या सुभाषिताचा अर्थ तंतोतंत लागू पडतो. आज ३१ डिसेंबर २०२५ सरांचा सेवानिवृत्तीचा दिवस.विद्यार्थी प्रिय,विद्यार्थ्यांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या श्री धवलशंक सी.बी. सरांचा सेवानिवृत्तीचा दिवस!

अगदी मनासारखं काहीतरी करण्याचा काळ आला.तुमच्या आयुष्यात फक्त आनंद,आनंद अन्? आनंदच यावा. तुमचे आरोग्य सदा चांगले राहो. तुम्हाला दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना

सेवानिवृत्तीच्या लाख लाख हार्दिक शुभेच्छा!

उद्या नवीन वर्ष १ जानेवारी २०२६ तुमचा जन्मदिवस/ वाढदिवस

मंगल पावलांनी जीवनात प्रवेश करून....मनात आनंदाच्या असंख्य

मधुलहरी निर्माण करणारा हा वाढदिवस

जीवनात जेवढा हवाहवासा वाटतो.... तेवढा कोणताही दिवस वाटला नाही अशा या मनपसंद दिवशी सुखाची स्वप्ने सफल होऊन अंतरंग आनंदाने भरून जावे हीच सदिच्छा

वाढदिवसाच्या आपणांस कोटी-कोटी हार्दिक शुभेच्छा !

---

जावक क्रमांक/२०
सार्वजनिक न्यास नौदणी कार्यालय,
बीड
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, बीड, प्रमद्यम (नहार) बिल्डिंग, औटी मंगल कार्यालयाजवळ, एस.बी.आय. समीर, जालना रोड, बीड, आय. समोर बीड, बीड, बीड

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन. क्रमांकः /०१२७७/१८/२५
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांकः.
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक कालीका माता मंदीर ट्रस्ट वडवणी बाबत ।
न्यासाचा पत्ता :- वडवणी ट. वडवणी जि.बीड, बीड, वडवानी, वडवणी
अर्जदार वैभव सुरेश वावधने,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर

चौकशी करणार आहेतः-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | KALIKADEVI TEMPLE IS SPREAD OVER AN AREA OF 800 SQ FT AND RS 1000000 WAS SPENT TO BUILD THE TEMPLE. | १000000 |

**(अ) जंगम मिळकतः रोख रु. १000000/- मात्र**
**-(अक्षरी रुपये दहा लाख मात्र फक्त)**

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महा नगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | WADWANI | ७२८ | GOPAL NAGAR, WADWANI TA.WADWANI JI.BEED | १000000/- | 5 YEAR | १000000/- |

(ब) स्थावर मिळकतः- रोख रु. १000000/- मात्र
(अक्षरी रुपये दहा लाख मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत था कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवा त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही अ समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २९-१०-२०२५ रोजी दिली।

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी काम**
**बीड**

---

### जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३०/१२/२०२५
अर्जदाराचे नाव - श्री. पंढरीनाथ व्यंकटी आंधळे
विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. पंकज प्रेमचंद नहार
प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४४४ प्लॉट क्र. ४ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.
आकार-१) पुर्वपश्चिम १०.६७ मीटर दक्षिणोत्तर ०९.१४ मीटर एकुण क्षेत्रफळ ९७.५२ चौ.मी.
पुर्व - शिंदे, पश्चिम - ०९ मीटर रस्ता
दक्षिण - प्लॉट क्र. .५, उत्तर - प्लॉट क्र.३
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३०/१२/२०२५
अर्जदाराचे नाव श्रीमती. मिना मसु शिंदे
विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. पंकज प्रेमचंद नहार
प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४४४ प्लॅट क्र.६ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.
आकार-१) पुर्वपश्चिम १०.६७ मी. दक्षिणोत्तर ०९.१४ मी. एकुण क्षेत्रफळ ९७.५२ चौ.मी.
पुर्व - शिंदे, पश्चिम - ०९ मीटर रस्ता
दक्षिण - प्लॉट क्र.७, उत्तर - प्लॉट क्र. ५
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३०/१२/२०२५
अर्जदाराचे नाव - श्री. भागवत त्रिबंक केकाण
विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री.स. आब्दुल सलिम स. आब्दुल रहिम
प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.१४९ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.
आकार-१) पुर्वपश्चिम ३० फुट दक्षिणोत्तर २० फुट एकुण क्षेत्रफळ ५५.७६ चौ.मी.
पुर्व - अंतर्गत रस्ता,पश्चिम - त्रिंबक गोविंद केकाण
दक्षिण - सय्य्द आब्दुल सलिम, उत्तर - अंतर्गत रस्ता
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही..
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३०/१२/२०२५
अर्जदाराचे नाव - श्री. त्रिबंक गोविंद केकाण
विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री.स. आब्दुल सलिम स. आब्दुल रहिम
प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. १४९ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.
आकार-१) पुर्वपश्चिम ३० फुट दक्षिणोत्तर २० फुट एकुण क्षेत्रफळ ५५.७६ चौ.मी.
पुर्व - भागवत त्रिंबक केकाण,पश्चिम - अंतर्गत रस्ता
दक्षिण - वाघमारे, उत्तर - रस्ता
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३०/१२/२०२५
अर्जदाराचे नाव - श्रीमती. सुरेखा भागवत आंधळे
विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. नारायण विश्वनाथ जाधव
प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.५३१ प्लॉट क्र.५७ मिळकत क्र.४४५९ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.
आकार-१) पुर्वपश्चिम ३५ फुट दक्षिणोत्तर ४५ फुट एकुण क्षेत्रफळ १४६.३७ चौ.मी.
पुर्व - २५ फुट रस्ता,पश्चिम - प्लॉट क्र. ४० व ४१
दक्षिण - ४० फुट रस्ता, उत्तर - प्लॉट क्र.५६
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

### जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३०/१२/२०२५
अर्जदाराचे नाव - श्रीमती. वंदना कैलास चव्हाण
विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्रीमती. सुदामती पांडूरंग उजगरे
प्रकरण : नाव नोंदणी बाबत नगर पंचायत मालकीचा गाळा क्र.९ वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.
आकार-१) गाळ्याप्रमाणे
पुर्व - सहन जागा
पश्चिम - सहन जागा
दक्षिण - गाळा क्र.०८
उत्तर - गाळा क्र.१०
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

---

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**यांत्रिकी मंडळ नांदेड**
**कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग बीड**
Web-www.mahatenders.gov.in

## ई-निविदा सूचना क्रमांक २० सन २०२५-२०२६ करिता (ऑनलाईन मागणी)


**कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग बीड हे नमुना बी-१ मध्ये खाली नमुद केलेल्या कामाकरीता ऑनलाईन निविदा मागवित आहेत. महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१९१७/ प्र.क्र. १०४ /१७/यांत्रिकी दि.१४.०३.२०१८ अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे पात्र कंत्राटदार, जलसंपदा विभागातील पांत्रिकी संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही. सदर कामाचे ई-निविदा संच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुक कंत्राटदारांनी संकेत स्थळावरुन सदर ई-निविदा संच ऑनलाईन खरेदी करुन डाऊनलोड करुन घ्यावयाचे आहेत. कोऱ्या निविदाची संचाची विक्री कार्यालयामार्फत केली जाणार नाही. ज्या निविदाकारांची या ई-निविदा करीता नोंदणी झालेली आहे, अशा निविदाकारांना निविदा कागदपत्र वेबसाईट वरुन उपलब्ध आहेत. निविदाकारांची ई-निविदा करीता नोंदणी, निविदा भरणे इत्यादी सर्व कार्यवाही ऑन लाईन पध्दतीने www.mahatenders.gov.in या महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर करणे आवश्यक आहे. सविस्तर निविदा सुचनेमध्ये नमूद केलेल्या कागदपत्रासह प्राप्त झालेला अर्ज छाननी करुन ई-निविदाकरीता नोंदणीसाठी पात्र करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग बीड यांचेकडून करण्यात येईल. सदर बाबत शंका समाधानकरीता निम्न नमुद केल्या नुसार संपर्क करण्यात यावा. १) ई-टेंडर हेल्प डेस्क नं. टोल फ्री १८०० ३०७० २२३२/मो. क्र. ०-७८७८१०७९८५/८६, २) कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग बीड फोन क्र. ०२४२-२२२४१९. निविदा संच दिनांक. २९-१२-२०२५ ते ०५-०१-२०२६ पर्यंत www.mahatenders.gov.in वर उपलब्ध आहेत. सदर निविदेच्या करार नाम्यात पश्चात अहृता निकष समाविष्ट आहे.**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये | इसारा रक्कम रुपये | एकुण सुरक्षा ठेव रुपये | काम पुर्ण करण्याचा कालावधी | काम करण्याची पात्रता | मुल्य रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | चांदापुर कालव्यावरील प्रकल्पाच्या मुख्य विमोचक द्वार ०.९ X ४ ०.९ मी.०१ नग, उच्चालक, ॲप्रोच ब्रीज निर्मिती व उभारणी, इतर अनुषंगीक दुरुस्ती. | ११,५७,१६२/- | ११,५७२/- | २३,१४४/- | १ महिना | सर्व पात्र कंत्राटदार | २000+ GST/- नापरतावा |

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी अभियंता**
**यांत्रिकी विभाग बीड**

जिमाका/बीड/ जाहि/ २०२५-२०/१५६

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि.३१ डिसेंबर २०२५ । पान ४



माजलगाव येथील नगरपरिषद निवडणुकीमध्ये विजयी झालेले नगराध्यक्ष बिलाल चाऊस व सर्वपक्षीय नगरसेवक मित्र दीपक मेंडके,मतीन शेख, राहुल लंगडे,अमोल सरोदे व इम्रान खान यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देताना युवा नेते बाबरी मुंडे.

# घरकुल लाभार्थ्यांची हेळसांड; तक्रारी वाढल्या

## खबरदार घोटाळा कराल तर; आ.प्रकाश सोळंके आक्रमक

माजलगाव :प्रतिनिधी

घरकुल योजना ही सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या हक्काचे घर मिळावे, यासाठी शासनामार्फत मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी घरकुल लाभार्थ्यांकडून सातत्याने तक्रारी प्राप्त होत असल्याने या बाबींची गंभीर दखल घेत माजलगाव व वडवणी येथील गटविकास अधिकारी यांची घरकुल योजनेबाबत आ.प्रकाश सोळंके यांनी सविस्तर आढावा बैठक घेतली.

माजलगाव व वडवणी येथील पंचायत समिती कार्यालयाकडून विविध प्रवर्गातील लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ दिला जातो. त्यांना या योजनेचा लाभ मिळावा म्हणून मोठी कसरत करावी लागते.तरी देखील या लाभार्थ्यांना वेळेत हप्त्यांचे वितरण केले जात नाही. खरतर त्यांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत सर्व प्रलंबित घरकुल कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट उद्दिष्ट ठेवून संबंधित अधिकाऱ्यांना आ प्रकाश सोळंके यांनी ठोस निर्देश



दिले. हे उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत दरमहा घरकुल योजनेचा आढावा घेण्यात येणार असून, ही योजना प्रभावी व परिपूर्ण करण्यासाठी प्रशासनासह सर्व संबंधितांनी जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे काम करावे, अशी सूचना सुद्धा आ प्रकाश सोळंके यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.



युवा नेते जयसिंग सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त टायगर ग्रुप वडवणी तालुका अध्यक्ष अजित गालफाडे यांच्याकडून. वंचिताचे हक्काचे घर. पसायदान सेवा प्रकल्प ढेकनमोहा. येथे अन्नदान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यावेळी उपस्थित . सरपंच संघटनेचे वडवणी तालुका अध्यक्ष महादेव शेंडगे केंडेपिंपरी माजी सरपंच लखन महागोविंद. व सहकारी मित्र तोफिक पठाण. टायगर ग्रुप वडवणी उप तालुकाध्यक्ष पांडू नानवर. संपर्कप्रमुख प्रदीप गलांडे. शहर प्रमुख राजेश कसबे. इत्यादी उपस्थित होते...

# वडवणी बसस्थानक सुरु; नागरिक खुश्श..

वडवणी:प्रतिनिधी

वडवणी शहर आणि तालुक्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आणि दीर्घकाळ प्रलंबित असलेला बसस्थानकाच्या जागेचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. बसस्थानक ठिकाणी ज्येष्ठ नेते राजाभाऊ मुंडे व युवा नेते भारत जगताप यांनी बस चालक वाहकांचा यथोचित सत्कार करून या ठिकाणी पेढे वाटले.

याबाबत अधिक वृत्त असे की, वडवणी न्यायालया समोरील सरकारी जागेवरचे अतिक्रमण हटवून त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात बसस्थानकासाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार आ प्रकाश सोळंके यांच्या सुचनेनुसार जेष्ठ नेते राजाभाऊ मुंडे, नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी याठिकाणी तातडीने पत्र्यांचे शेड उभारून तात्पुरत्या बसस्थानकाची व्यवस्था करावी म्हणून संबंधितांना सुचना दिल्या होत्या. गेल्या दोन-तीन दिवसापासून या ठिकाणी साफसफाई चे काम जोरात सुरू होते. झाडे तोडून परिसर स्वच्छ, सुंदर करण्याचा नगरपंचायत च्या माध्यमातून काम केले. त्याचबरोबर या ठिकाणी आवश्यक त्या तात्पुरत्या सुविधा उपलब्ध करण्यासंबंधी नियोजन केले गेले. काल या नवीन बस स्थानकात किल्लेधारुर डेपो च्या बसेस सुरु केल्या. या बसेस चे चालक वाहक यांचा व काही प्रवाशांचा यावेळी यथोचित सत्कार करुन पेढे वाटप करण्यात आले.

निश्चितच यामुळे प्रवासी, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. नागरिकांच्या



दळणवळणाचा प्रश्न सुखकर झाला आहे.वडवणी शहराच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार प्रकाश सोळंके यांच्या माध्यमातून कायमस्वरूपी बसस्थानकासाठी लवकरच निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याचीही माहिती यावेळी जेष्ठ नेते राजाभाऊ मुंडे व युवा नेते भारत जगताप यांनी दिली. येत्या काही महिन्यांत याच ठिकाणी सुसज्ज आणि कायमस्वरूपी बसस्थानक उभारले जाणार असुन बसस्थानकाचा कायमचा प्रश्न पूर्णतः सुटला आहे.













हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड – ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३–२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)